RNI No. MAHBIL /2009/31733

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार—अ

वर्ष १, अंक १३] शुक्रवार, मार्च १३, २०१५/फाल्गुन २२, शके १९३६ [पृष्ठे ३, किंमत : रुपये १५.००

### असाधारण क्रमांक ३८

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**महसूल व वन विभाग**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२, दिनांक १३ मार्च २०१५.

**अधिसूचना**

**भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३.**

क्रमांक संकीर्ण-०१/२०१५/प्र.क्र. ३/अ-२.— ज्याअर्थी, भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क (सुधारणा) अध्यादेश, २०१४ (२०१४ चा अध्या. ९) याद्वारे भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) (यात यापुढे ज्याचा निर्देश " उक्त अधिनियम " असा करण्यात आला आहे) यामध्ये कलम १०क समाविष्ट केले असून त्यामध्ये अशी तरतूद केली आहे की, समुचित शासनाला, जनहिताच्या दृष्टीने, अधिसूचनेद्वारे, उक्त अधिनियमाच्या प्रकरण दोन व प्रकरण तीन यांच्या तरतुदी लागू करण्यापासून पुढील प्रकल्पांपैकी कोणत्याही प्रकल्पाला सूट देता येईल :—

(क) संरक्षण सिद्धता ; किंवा संरक्षणविषयक उत्पादन यांसह भारताची राष्ट्रीय सुरक्षा किंवा संरक्षण यादृष्टीने महत्त्वाचे असे प्रकल्प ;

(ख) विद्युतीकरण, सिंचन, रस्ते, पाणीपुरवठा व जल संधारण यांसह ग्रामीण भागातील पायाभूत सुविधा ;

(ग) परवडण्याजोगी घरे व गरीब लोकांसाठी घरे ;

(घ) औद्योगिक कॉरिडॉर्स ; आणि

(ङ) जेथे जमिनीची मालकी शासनाकडे निहित असेल तेथे सार्वजनिक-खाजगी भागीदारी अंतर्गत शाळा, रुग्णालये, वीज प्रकल्प यांसहित पायाभूत सुविधा आणि सामाजिक पायाभूत सुविधा प्रकल्प ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र राज्याच्या क्षेत्रात स्थित असलेल्या जमिनीचे संपादन करण्याच्या संबंधात समुचित शासन असणाऱ्या महाराष्ट्र शासनास, जनहिताच्या दृष्टीने, उक्त कलम १०क मध्ये नमूद केलेल्या सर्व प्रकल्पांना उक्त अधिनियमाच्या प्रकरण दोन व प्रकरण तीन यांच्या तरतुदी लागू करण्यापासून सूट देणे इष्ट वाटते ;

त्याअर्थी, आता, महाराष्ट्र शासन, उक्त अधिनियमाच्या कलम १०क द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, याद्वारे उक्त कलम १०क मध्ये नमूद केलेल्या सर्व प्रकल्पांना, उक्त अधिनियमाचे प्रकरण दोन व प्रकरण तीन यांच्या तरतुदी लागू करण्यापासून सूट देत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**सु. कि. गावडे,**
शासनाचे उप सचिव.

## REVENUE AND FORESTS DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya,
Mumbai 400 032, dated the 13th March 2015.

*NOTIFICATION*

RIGHT TO FAIR COMPENSATION AND TRANSPARENCY IN LAND ACQUISITION, REHABILITATION AND RESETTLEMENT ACT, 2013.

No. GEN-01/2015/C.R.3/A-2.—Whereas, section 10A of the Right to Fair Compensation and Transparency in Land Acquisition, Rehabilitation and Resettlement Act, 2013 (30 of 2013) (hereinafter referred as "the said Act"), inserted by the Right to Fair Compensation and Transparency in Land Acquisition, Rehabilitation and Resettlement (Amendment) Ordinance, 2014 (Ord. No. 9 of 2014), provides that the appropriate Government may, in the public interest, by notification exempt any of the following projects from application of provisions of Chapter II and Chapter III of the said Act, namely :—

(*a*) such projects vital to national security or defence of India and every part thereof, including preparation for defence; or defence production ;

(*b*) rural infrastructure including electrification, irrigation, roads, water supply and water conservation ;

(*c*) affordable housing and housing for the poor people ;

(*d*) industrial corridors ; and

(*e*) infrastructure and social infrastructure projects including schools, hospital, power projects under public private partnership where the ownership of land continues to vest with the Government ;

And Whereas, the Government of Maharashtra, being an appropriate Government in relation to acquisition of land situated within the territory of the State of Maharashtra, considers it expedient, in the public interest, to exempt all the projects mentioned in the said section 10A from the application of the provisions of Chapter II and Chapter III of the said Act.

Now, therefore, the Government of Maharashtra, in exercise of the powers conferred by section 10A of the said Act, hereby, in the public interest, exempts all the projects mentioned in the said section 10A from the application of the provisions of Chapter II and Chapter III of the said Act.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

S. K. GAWADE,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.